कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२१-२२/१७६७
दि.०२/११/ २०२१

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ५४ वी मराठी 'अ' गट नाट्यस्पर्धा दि.७ डिसेंबर २०२१ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण ९ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा रविंद्र भवन, साखळी यांच्या सहकार्याने येथील मा. मनोहरबुवा शिरगांवकर नाटयगृहात, रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. २० डिसेंबर २०२१ पर्यंत चालणार आहे. शासनाने घालून दिलेली कोविड-१९ च्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन या स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि.७ डिसेंबर २०२१ रोजी **हंस संगीत नाटय मंडळ, वारखंडे-फोंडा** या संस्थेच्या कौस्तुभ नाईक लिखित **"हत्ती मातला"** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि. ९ डिसेंबर रोजी प्रसाद प्रेमानंद कळंगुटकर यानी लिहिलेले **"आसन. एन केन"** हे नाटक **रुद्रेश्वर, पणजी** ही संस्था सादर करणार आहे. **अथश्री, फोंडा** या संस्थेच्या वतीने डॉ. स्मिता जांभळे व आदित्य जांभळे लिखित **"सौ."** हे नाटक दि.१० डिसेंबर रोजी होईल. अधीर भट यांच्या लेखणीतून साकार झालेल्या व सौरभ कारखानीस यांनी अनुवादित केलेले **"द ट्रायल"** हे नाटक दि.१३ डिसेंबर रोजी **राजहंस क्लब, पणजी-गोवा** ही संस्था सादर करेल तर दि. १४ डिसेंबर रोजी विजयकुमार नाईक यांनी लिहिलेल्या **"पालशेतची विहीर"** या नाटकाचा प्रयोग **विजयकुमार्स ट्रॅव्हलींग बॉक्स थिएटर, वारखंडे-फोंडा** ही संस्था सादर करणार आहे.

दि.१५ डिसेंबर रोजी तनवीर खान यांच्या लेखणीतून साकार झालेले व वर्धन कामत यांनी अनुवादित केलेले **"फक्त चोवीस तास"** हे नाटक **श्री नागेश महालक्ष्मी प्रासादिक नाटयसमाज, बांदिवडे-फोंडा** ही संस्था सादर करणार आहे. दि.१६ डिसेंबर रोजी मारियो बेनेडेट्टी यांच्या लेखणीतून उतरलेल्या **"पेद्रो आणि कॅप्टन"** या नाटकाचा प्रयोग **मंगलमूर्ती कलाबहार, भिरोंडा-सत्तरी** ही संस्था सादर करणार असून हे नाटक नारायण आशा आनंद यांनी अनुवादित केलेले आहे. **दुर्वा थिएटर्स, करमळी-तिसवाडी** ही संस्था गोविंद मोकाशी लिखित **"प्रश्न तुमच्या निर्णयाचा"** हे नाटक दि.१७ डिसेंबर रोजी सादर करेल. तर दि.२० डिसेंबर रोजी स्पर्धेचा समारोप **श्री हनुमान सेवा समिती, बांबर, वाळपई-सत्तरी** या संस्थेच्या सौ. आसावरी कुलकर्णी यांनी लिहिलेले **" प्रजासत्ताक"** या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून रु.५०/-च्या प्रवेशिका रविंद्र भवन, साखळीच्या तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटय रसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी